INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शहरीकरणाची प्रक्रिया आणि शाश्वत विकास

## (Urbanization Process and Sustainable Development in Chhatrapati Sambhajinagar District)

**सुनिता राजाराम चाफेकानडे**
संशोधक विद्यार्थिनी,
भूगोल विभाग,
संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव,
जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र, भारत)

**डॉ. सी. यू. भोरे**
संशोधन मार्गदर्शक व विभागप्रमुख,
भूगोल विभाग,
संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव,
जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र, भारत)

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/12.2025-17391478/IRJHIS2512022

***सारांश:***

*शहरीकरण ही संस्कृतीशी जोडलेली घटना आहे. ते जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये बदल घडवून आणते. त्यामुळे पारंपरिक जीवनशैलीकडून आधुनिक जीवनशैलीकडे वाटचाल होते. शहरीकरणामुळे पायाभूत सुविधांचा विकास होतो आणि लोक उच्चप्रकारच्या शहर वाहतूक, उच्चशिक्षण, दळणवळण, बँकिंग, चांगले आरोग्य आणि अन्न सुविधांचा आनंद घेतात.*

*छत्रपती संभाजीनगर हे अशाच एका ऐतिहासिक आणि पुरातत्वीय भूमी असलेल्या परिसरात वसलेले आहे. तसेच ते औद्योगिक क्षेत्रासाठी प्रसिद्ध आहे. शहरातील लोकसंख्या आणि आर्थिक विकासातील जलद वाढीमुळे पर्यावरणीय परिस्थितीवर होणारा परिणाम तसेच शाश्वत विकास ज्या पर्यावरणीय मार्गदर्शक तत्त्वावर अवलंबून आहे, त्या संसाधनाच्या मुलभूत घटकांवर होणारा प्रभाव यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.*

***मुख्य शब्द :*** *शहरीकरण, औद्योगीकरण, शाश्वत विकास, लोकसंख्या वाढ, आधुनिक जीवनशैली*

**प्रस्तावना :**

शहरीकरणास समाजाच्या परिवर्तनाचे व प्रगतीचे एक लक्षण मानले जाते. शहरीकरण हे आर्थिक विकासाचा परिणाम असते. ते जसे आर्थिक विकासाचे कारण असू शकते तसेच अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचे निदर्शक म्हणूनही शहरीकरणाकडे पाहिले जाते. शहरीकरण शहरवासीयांच्या अद्वितीय जीवनशैलीचे वर्णन करण्यासाठी वापरला जाणारा शब्द आहे. शहर हे पृथ्वीवरील मानवनिर्मित निर्मिती आहे, जिथे कृत्रिमतेला सीमा नाही. परिणामी या कृत्रिमतेमुळे या शहरी वस्त्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे जीवन अत्यंत गुंतागुंतीचे बनले आहे म्हणूनच एम. बी. क्लिनार्डचा असा विश्वास आहे की, शहरीकरण ही जीवन पद्धतीमध्ये संघर्ष, जलद सामाजिक बदल, उच्च गतिमानता आणि व्यक्तिवादी जीवनशैलीची प्रवृत्ती याद्वारे वैशिष्ट्यकृत जीवनप्रणाली आहे.

मध्ययुगापर्यंत शहरीकरणाची संकल्पना एक परीष्कृत, सुसंस्कृत, सभ्य, वरच्या दिशेने फिरणारी आणि समृद्ध जीवनशैली म्हणून आपली ओळख कायम ठेवत होती. तथापि, आधुनिक काळात शहरीकरणाची संकल्पना लक्षणीयरीत्या बदलली आहे. शहरीकरणाची संकल्पना ही शहरीकरणाच्या प्रादेशिक एकतेचे विश्लेषण करण्यासाठी आधारभूत मानली जाते.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध प्रामुख्याने दुय्यम स्रोतावर आधारित असून त्यासाठी जिल्हा जनगणना अहवाल, विविध संदर्भ ग्रंथ, शोध प्रबंध तसेच विविध संशोधन पत्रिकेमध्ये प्रकाशित झालेले शोध निबंध, जिल्हा माहिती पुस्तिका यांचा उपयोग करून शोधनिबंध तयार करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शहरीकरणास कारणीभूत असणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
2. शहरी विकासाचे प्रमुख नियंत्रक अभ्यासणे
3. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा विकास आणि नियोजन यांचा अभ्यास करणे.
4. शहरीकरणातील प्रमुख आव्हाने आणि विकासातील शाश्वतता यांचा अभ्यास करणे

**छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील शहरीकरण:**

**1.औद्योगिक केंद्र (AURIC):**

छत्रपती संभाजीनगर म्हणजेच औरंगाबाद औद्योगिक शहर (AURIC), दिल्लीचा एक भाग मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर (डीएमआयसी) हा विकासाचा एक प्राथमिक उत्प्रेरक आहे. शेंद्रा आणि बिडकीन सारखे क्षेत्र इलेक्ट्रॉनिक वाहने, औषध निर्माण आणि आयटी उद्योगाचे केंद्रबिंदू बनले आहेत, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण आणि त्यामुळे स्थलांतर होत आहे

**2. महानगर नियोजन :**

शहरी विस्ताराचे व्यवस्थापन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेले छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सीएसएमआरडीए) आता 2000 चौरस किमी पेक्षा जास्त क्षेत्र व्यापते आणि त्यात नियोजित प्रादेशिक विकास सुनिश्चित करण्यासाठी 313 गावे समाविष्ट करण्यात आली आहेत.

**3. स्मार्ट सिटी मिशन :**

सेवा, वितरण आणि शहरी राहणीमान सुधारण्यासाठी शहर जीआयएस आधारित मॅपिंग आणि ई-गव्हर्नरसह तंत्रज्ञान प्रगत पायाभूत सुविधांचे एकत्रीकरण करीत आहे

**4. रियल इस्टेट ब्रूम :**

स्ट्रॅटेजिक कनेक्टिव्हिटी, उत्तर भारताशी रेल्वे लिंक्स आणि आगामी रिंग रोड मुळे निवासी आणि व्यावसायिक रिअल इस्टेटच्या मागणीत वाढ झाली आहे.

**5. लोकसंख्या बदल :**

अलीकडच्या दशकात जिल्ह्याची शहरी लोकसंख्या 43.8 % पेक्षा जास्त वाढली आहे आणि आता हे शहर महाराष्ट्रातील पाचव्या क्रमांकाचे सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहरझाले आहे.

**6. मेट्रो हब :**

छत्रपती संभाजीनगर येथील शाश्वत औद्योगिक आणि पायाभूत सुविधांच्या वाढीसह भविष्यातील मेट्रो हब म्हणून स्थान मिळवण्याचे कार्य पूर्णकरत आहे.

**7. सांस्कृतिक जतन :**

विकासाची धोरणे शहराच्या ऐतिहासिक वारशासह आधुनिकीकरणाचे संतुलन साधण्यासाठी अधिकाधिक लक्ष केंद्रित करतात. ज्यामध्ये शहरातील 52 दरवाजे आणि युनेस्को स्थळांचा जवळचा समावेश आहे.

**छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील शहरीकरणास कारणीभूत प्रमुख घटक:**

**1. आर्थिक संधी :**

छत्रपती संभाजीनगर मध्ये कापड, रेशीम, औषध निर्माण, आयटी आणि लॉजिस्टिक क्षेत्रातील वाढ, गुंतवणूक आणि विविध क्षेत्रातील नोकऱ्या लोकसंख्येला आकर्षित करण्याचे काम करत आहेत.

**2. औद्योगिक कॉरिडॉर :**

डीएमआयसी प्रकल्पांतर्गत ऑरिकसारख्या टाऊनशिपचा विकासही शहरीकरणास प्रभावित करतो.

**3. शिक्षण आणि पर्यटन :**

प्रमुख विद्यापीठे आणि युनेस्कोच्या स्थळांमध्ये समाविष्ट असणारी पर्यटन स्थळे(वेरूळ-अजिंठा) यामुळे शहरी सुविधांची मागणी वाढत आहे.

**4. स्थलांतर :**

ग्रामीण भागातून शहराकडे विविध क्षेत्रातील वाढत्या रोजगाराच्या संधीमुळे तसेच शिक्षण आणि आरोग्यविषयक सुविधांमुळे स्थलांतरावादून शहरीकरणावर प्रभाव पडतो.

**शहरीकरणातील आव्हाने व शाश्वतता :**

पृथ्वी ही मर्यादित क्षमता असलेली एक अंतराळयान आहे व तिच्या संगोपन क्षमतेला मर्यादा आहेत तिच्याकडे असणाऱ्या निश्चित स्वरूपाच्या संसाधनाचा विवेक पूर्ण आणि काटकसरीने वापर केला गेला तर मानव जास्त काळ या अंतराळ्यानात टिकू शकेल अन्यथा ते नष्ट होईल. एकीकडे मानवी समाजाची जलद वाढ आणि दुसरीकडे मोठ्या आणि गुंतागुंतीच्या प्रणालीचे व्यवस्थापन यामुळे विविध पर्यावरणीय समस्या, प्रदूषण आणि पर्यावरणीय संतुलन बिघडत आहे शहरीकरणाचे पर्यावरणीय घटकावरील दूरगामी परिणाम म्हणजे मातीची धूप, जंगलांचा नाश, उत्पादकतेमध्ये घट, हवामानातील बदल, जागतिक तापमान वाढ, पर्यावरणीय प्रदूषण, खनिज संसाधनाचा ऱ्हास हे होत. शहरीकरणातील प्रमुख आव्हाने पुढील प्रमाणे सांगता येतील.

**1. ग्रामीण-शहरी स्थलांतर :**

शहरीकरणामुळे लोकसंख्या वाढीची समस्या निर्माण झाली आहे 1991 ला लोकसंख्येची वाढ 37.5% होती तर 2011 मध्ये ही 43.8% इतकी झाली आहे.

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्या वाढ आणि शहरीकरण दर्शविणारा तक्ता**

| अ . क्र. | तालुका | लोकसंख्या वाढ (%) | | शहरीकरण (%) | |
|---|---|---|---|---|---|
| | | 2001 | 2011 | 2001 | 2011 |
| 1. | कन्नड | 17.98 | 17.08 | 11.81 | 11.95 |
| 2. | सोयगाव | 16.74 | 25.45 | 0.00 | 0.00 |
| 3. | सिल्लोड | 18.43 | 23.67 | 15.07 | 16.18 |
| 4. | फुलंब्री | 17.36 | 18.95 | 0.00 | 0.00 |
| 5. | छत्रपती संभाजीनगर | 50.34 | 36.26 | 77.30 | 82.31 |
| 6. | खुलताबाद | 22.06 | 16.58 | 12.60 | 13.31 |
| 7. | वैजापुर | 18.56 | 19.94 | 14.28 | 13.26 |
| 8. | गंगापुर | 33.33 | 28.28 | 8.00 | 28.48 |
| 9. | पैठण | 19.35 | 21.09 | 12.01 | 15.24 |

**2. जमिनीच्या वापरातील बदल :**

वाढत्या शहरीकरणामुळे शेत जमिनीचे रूपांतरण रस्ते, वस्त्या तसेच उद्योगाच्या वाढीसाठी केल्याने वनस्पतीचे नुकसान आणि जलस्त्रोतावर दबाव यासारख्या समस्यांचा सामना करावा लागत आहे.

**3. पर्यावरणीय ताण :**

छत्रपती संभाजीनगरमधील शहरीकरणाच्या जलद विस्तारामुळे पडेगावसारख्या ठिकाणी अवैज्ञानिक कचरा विल्हेवाट आणि ऐतिहासिक स्थळांवरील अतिक्रमण यासारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

**4. पायाभूत सुविधांमधील तफावत:**

शहरीकरणाने ऐतिहासिक दृष्ट्या झोपडपट्ट्या आणि ड्रेनेज समस्यांसारखी आव्हाने निर्माण केली आहेतज्यांचे निराकरण सध्याच्या ब्लू प्रिंट्स मध्ये नियोजित निवासी आणि औद्योगिक कॉरिडोर द्वारे करण्याचे उद्दिष्ट आहे

**5. सामाजिक असमानता :**

शहरीकरणामुळे सर्वाधिक परिणाम सामाजिक असमानतेमध्ये दिसून येतो ज्यामध्ये जलद सामाजिक बदल, अवलंबित्व, सामाजिक नियमांशी बांधिलकी नसणे, वैचारिक विरोधाभास, जीवनाकडे पाहण्याचा वैयक्तिक दृष्टिकोन, मानवी मूल्यांपेक्षा आर्थिक मूल्यांना प्राधान्य आणि दिखावा यासारख्या गोष्टींचा समावेश होतो.

**6. संसाधन व्यवस्थापन :**

पर्यावरणीय समतोल, जतन आणि संवर्धनासाठी संसाधनाच्या वापराचा दर आणि वापराचे स्वरूप निश्चित करणे

आवश्यक आहे.

**7. नदी पुन: संचयित करणे :**

शहरी नदी व्यवस्थापन योजना (यूआरएमपी) सारखे चालू प्रयत्न खाम आणि सुखना नद्यांचे पुनर्जीवन करण्यावर लक्ष केंद्रित करतात, ज्या पूर्वी शहरी प्रवाहामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषित होत्या

**विकास व शाश्वतता :**

छत्रपती संभाजीनगरमध्ये क्लासिक कोअर पेरी-फेरी वाढ दिसून येते. ज्यामध्ये शहराभोवती तीव्र शहरी विस्तार आणि भू वापरातील बदल केंद्रित आहेत जे आर्थिक घटकामुळे घडतात. परंतु यांचे शाश्वत व्यवस्थापन करणे हे प्रमुख आव्हान आहे यासाठी शहरी नियोजन आणि विकेंद्रीत विकासाची आवश्यकता आहे.

**स्मार्ट सिटी मिशन :**

ई-गव्हर्नर्स, पायाभूत सुविधा, आरोग्य आणि शाश्वत विकास यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. सीएसएमआरडीए (छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) प्रादेशिक विकासाचे धोरणात्मक नियोजन आणि समन्वय साधण्यासाठी याची स्थापना करण्यात आली. त्यानुसार सर्व जबाबदारी कार्यान्वित करणे आवश्यक आहे. पायाभूत सुविधा, वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेता वाहतूक, गृहनिर्माण आणि उपयुक्तता सेवांचा विस्तार करणे गरजेचे आहे संसाधन व्यवस्थापन, पर्यावरणीय संसाधने आणि सामाजिक सेवांसाठी पर्यावरणीय संसाधने वापरासाठी चांगल्या नियोजनाची आवश्यकता आहे

**निष्कर्ष व समारोप :**

छत्रपती संभाजीनगर येथे वेगाने शहरीकरण होत आहे जे उद्योगांमधील आर्थिक वाढ, कापड, ईव्ही, आयटी, शैक्षणिक आणि पर्यटन केंद्र म्हणून ओळखले जात आहे. ज्यामुळे स्मार्ट सिटी मिशन यासारख्या उपक्रमांतर्गत ग्रामीण ते शहरी स्थलांतर आणि विकास लक्षणीयरित्या होत आहे. या वाढीमध्ये पायाभूत सुविधांचा विस्तार, सेवांची वाढती मागणी यामध्ये आरोग्य, शिक्षण आणि शहरी नियोजन, जमीनीचा वापर आणि संसाधन व्यवस्थापनातील आव्हाने यांचा समावेशहोतो. ज्यामुळे हे संक्रमण शाश्वतपणे व्यवस्थापित करण्यासाठी समन्वित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची:**

1. सवदी ए. बी., "भूगोलाचीमूलतत्त्वे", निराली प्रकाशन, पुणे.
2. शुक्ला राजेश, शुक्ला रश्मी "नगरीय भूगोल", अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.
3. Bhore Chatragun Udhavrao, "Study Of Urbanization In Aurangabad City", (PhD Thesis) 2013, Dr Babasaheb Ambedkar Marathwada University, Chhatrapati Sambhaji Nagar.
4. Dr. Bhore C. U., "Special Patterns Of Urbanization And Population Growth In Chhatrapati Sambhaji Nagar District: A Geographcal Analysis (1961-2011)", March 2025, Journal Of Research And Development, Volume - 17, issue - 3.

5. Dumane Priyanka Ar.,"Understanding The lmpact of Encroachment of Developing Historical cities The case of Chhatrapati Sambhaji Nagar August 2023, Research Gate.
6. Hussain Majid, "Geography of India" McGraw Hill Education (India) Private Limited, Chennai.
7. Hussain Majid, "World Geography" Forth Edition, Rawat publications, Jaypur.
8. Singh Radhika, "Population Growth And Environment: A Geographical study of Dobhi Development Block District Jaunpur" (PhD thesis), 2014, V.B.S. Purvanchal University, Jaunpur.